ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# महाराष्ट्रातील शिक्षकांचे शैक्षणिक ब्लॉग : एक विश्लेषणात्मक अभ्यास

## Educational Blogs of Teacher's in Maharashtra: A analytical Study



*डॉ.संतोष खिराडे*
*सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.*

**सारांश : (Abstract)**

महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेल्या ब्लॉगचे विश्लेषणात्मक अध्ययन सदरील संशोधनात करण्यात आले आहे. संशोधनासाठी संशोधकाने एकूण वीस ब्लॉगचा अभ्यास करून माहितीचे विश्लेषण केले आहे. शिक्षक निर्मित ब्लॉग हे विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक आणि वाचकांना उपयुक्त असे आहेत. ई अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्यात ब्लॉगर शिक्षक यशस्वी ठरले आहेत. म्हणूनच महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेले हे ब्लॉग आधुनिक शिक्षणातील एक नवप्रवाह (New Trends In Education) ठरत आहेत.

**प्रस्तावना : (Introduction)**

आधुनिक जगात इंटरनेट मूळे ज्ञानात झपाटयाने प्रगती होत आहे. ज्ञान केवळ मर्यादित घटकापूरतेच न राहता ते सर्वांच्या मालकीचे झाले आहे किंबहूना ज्ञानाचे लोकशाहीकरण झाले आहे. तसेच ज्ञानप्राप्तीच्या मार्गातही बदल होत आहेत. पुस्तकाची जागा हळूहळू ईलेट्रानिक पुस्तके (e-books) घेतांना दिसून येत आहे. तर शैक्षणिक तंत्रविज्ञानामूळे अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया देखील बदलत आहे. देश डिजीटल इंडीया म्हणून आपली ओळख निर्माण करत आहे. तर खडूफळा याची जागा एलसीडी प्रोजेक्ट्र वा डिजीटल फलकाने घेतली आहे. पारंपरिक वर्ग आता डिजीटल होत आहे तर आमची आमची शाळा 'डिजीटल शाळा' झाली आहे असे शिक्षक मोठया अभिमानाने सांगु लागला आहे. अनेक शिक्षकांनी स्वतः बदलत तंत्रज्ञानाची कास धरली आहे. तंत्रज्ञान हे केवळ प्रमाणपत्र मिळविण्याच्या अभ्यासक्रमापूरते मर्यादित राहिले नाही; तर जो तो तंत्रज्ञानाचा वापर मोठया वेगाने करू लागला आहे. तरूण वर्गांचे मोठे आकर्षण म्हणजे तंत्रज्ञान आहे. समाजिक संबंधाचे जाळे निर्माण करण्यासाठी सर्व जनच फेसबूक (Facebook) आणि वॉटसॲप्स (Whatapp) वापरत आहे. नवीन तंत्रज्ञान सर्व घटकांच्या आवक्यात आले आहे. अनेक परीक्षा केवळ ऑनलाईनच घेतल्या जात आहेत. जर संगणक हाताळण्याचे ज्ञान नसलेल्यांना नवीन पीढी अज्ञानी समजत आहे. या सर्वांचा परिपाक म्हणजे आपल्या शिक्षणपद्धती चा देखील नव्याने विचार होत आहे. तंत्रज्ञानाचे शिक्षणाचा मार्ग अगदी सोपा केला आहे. संपूर्ण जीवनच तंत्रज्ञानाने व्यापून टाकले आहे. आधुनिक शिक्षणपद्धतीत ज्ञान मिळविण्याच्या अनेक ई माध्यमापैकी एक म्हणजे ब्लॉग (Blog) होय. सध्याच्या ऑनलाईन युगात ब्लॉग हा महत्त्वाचा भाग बनला आहे. प्रत्येक जनच आता आपल्याला हवी असलेली माहिता वा ज्ञान ब्लॉग वरून प्राप्त करत आहे. महाराष्ट्रातील अनेक तंत्रस्नेही शिक्षकांनी स्वतःची ब्लॉग निर्मिती करून दैनंदिन कार्यालयील व शैक्षणिक कामी त्याचा यशस्वी उपयोग केला आहे. जगाची भाषा इंग्रजी असली तरी महाराष्ट्रीय शिक्षकांनी अगदी मराठी भाषेत ब्लॉग तयार केले आहेत. प्रामुख्याने जिल्हापरिषदेच्या शाळेतील शिक्षकांनी हे कार्य केल्याचे दिसून येते. शिक्षकांचे ब्लॉग हा शिक्षणातील एक नवप्रवाह ठरत आहे. सदरील संशोधन लेखातून शिक्षकांच्या ब्लॉगचे विश्लेषणात्मक अध्ययन संशोधकाने केले आहे.

**Key word:** ब्लॉग (Blog) , ब्लॉगर (Blogger), ब्लॉगींग (Blogging)

**ब्लॉग म्हणजे काय ? (What is Blog ?)**

- ब्लॉग हे नियमित पणे अपडेट केले जाणारे वेबपेज वा वेबसाईट असून जी व्यक्तीगत किंवा छोटया समूहाकडून चालविली जाते जी आनौपचारिक वा संवादरूपी लेखन पद्धतीने लिहली जाते.
- ब्लॉग हे इटरनेट वर असलेले एक Jernals वा दैनदिनी आहे.
- ब्लॉग (Blog) हा शब्द Web आणि Log या दोन शब्दांना जोडून तयार झाला असून Blog ब्लॉग ला वेबलॉग (Weblog) असेही म्हणतात. सोप्या शब्दात आपले विचार,अनुभव आणि बरेच काही वा याचे लेखी रूप (Log) इंटरनेट (Web) वर प्रकाशित करणे म्हणजे ब्लॉग होय.
- ब्लॉगर (Blogger) : जो व्यक्ती ब्लॉग तयार करतो त्यास ब्लॉगर असे म्हणतात.
- ब्लॉगींग (Blogging) : ब्लॉग लेखनाची क्रिया म्हणजेच ब्लॉगींग होय.
- शैक्षणिक ब्लॉग (Educational Blog) : जो ब्लॉग शैक्षणिक हेतूसाठी तयार केला जातो त्यास शैक्षणिक ब्लॉग असे म्हणतात.

**ब्लॉगचा इतिहास : (History of Blog)**

1994 मध्ये जस्टीन हॉल या विद्यार्थ्यांने पहिला ब्लॉग तयार केला परंतु त्यावेळी त्याला ब्लॉग असे संबोधण्यात आले नव्हते. तर त्यास वैयक्तिक मुखपृष्ठ असे म्हटले गेले. 1997 पर्यंत वेबलॉग हा शब्द वापरण्यात आला नव्हता. जोर्न बार्गेर यांनी या शब्दांची निर्मिती केली. **1999** साली प्रोग्रामर पीटर मेरोहोल्स यांनी वेबलॉग यावरून ब्लॉग असे लहान रूप तयार केले. पुढे विविध प्रकारच्या ब्लॉगींग साईट तयार झाल्या. त्यापैकी महत्त्वाच्या साईट्स म्हणजे Blogger , WordPress, Tumblr, Medium, Ghost, Squarespace, Wix, Joomla, Weebly, Yola, Contentful, Jekyll, Svbtle, LiveJournal (like Blogger) , Postach.io, Pen.io इत्यादी होत. टॉमब्लर ही एक मायक्रोब्लॉगींग आणि सोशल नेटवर्किंग वेबसाईट आहे. टविटर चे सहसंस्थापक इव्हन विल्यम्स यांनी Medium हा ऑनलाईन प्रकाशन प्लॅटफॉर्म 2012 मध्ये विकसित केला आहे. घोस्ट हा एक ब्लॉगींग प्लॅटफॉर्म आहे. जो वैयक्तिक ब्लॉगर्ससाठी तसेच ऑनलाईन प्रकाशनाची प्रकिया सुलभ करण्यासाठी तयार केले आहे. ब्लॉगच्या स्वरूपावरून ब्लॉगचे विविध प्रकार आहेत. ते म्हणजे वैयक्तिक ब्लॉग, गटाने तयार केलेले ब्लॉग वा समूह ब्लॉग, सूक्ष्म ब्लॉग सहकारी वा संस्थागत ब्लॉग, एकत्रित ब्लॉग, शैलीनुसार ब्लॉग, माध्यम प्रकारानुसार ब्लॉग, साधन प्रकारानुसार, उलट ब्लॉग, इत्यादी. थोडक्यात ब्लॉगींग करण्यासाठी विविध प्लॅटफॉर्म अगदी सहजपणे उपलब्ध आहेत. त्यापैकी आपण आपल्याला सोयीची साईट निवडून त्यावर ब्लॉग बनवू शकतो.

**ब्लॉग-शिक्षणातील एक नवप्रवाह : (Blog- A new Trends in Education)**

आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आपण सर्वजण तंत्रज्ञानाचा उपयोग दैनंदिन जीवनात घेतो. मोबाईल मधील इंटरनेट डेटा पॅक संपला तर आपल्याला सुनेसुने वाटते. आज इंटरनेट संचार आणि संवाद हया प्रमुख भूमिका निभावताना दिसते. ब्लॉगींग चे अनेक फायदे आपल्याला आहेत. ब्लॉगिंग करिता जास्तीचे तांत्रिक ज्ञान आवश्यक नाही. शिक्षक विदयार्थी पालक तसेच संपूर्ण समुदायाशी जोडून राहण्यासाठी आपण ब्लॉगचा उपयोग करू शकतो. ब्लॉगच्या माध्यमातून लेख वर्गातील उपक्रम वा प्रकल्प इत्यादी प्रकाशित करता येणे सहज शक्य आहे. स्वतःच्या अभिव्यक्तीसाठी ब्लॉग हे एक उत्तम साधन आहे. विद्यार्थ्यांच्या वाचन आणि लेखनास प्रोत्साहन देण्यासाठी ब्लॉग उपयुक्त साधन आहे. विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक उपयुक्त साहित्य यामध्ये फोटो, संशोधन उपयुक्त साहित्य आणि इतर आवश्यक साहित्याची साठवणूक देखील आपल्या ब्लॉग वर करणे सहज शक्य होते. विद्यार्थी स्वतःचे लेख ब्लॉगवर प्रकाशित करू शकतात.

**संशोधनाचे शीर्षक (Research Problem) :**

**महाराष्ट्रातील शिक्षकांचे शैक्षणिक बॉल्गः एक विश्लेषणात्मक अध्ययन**

Educational Blogs of Teacher's in Maharashtra: A analytical Study

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :**

1) महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेल्या ब्लॉगचा शोध घेणे.
2) महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेल्या ब्लॉगचा अभ्यास करणे.
3) शिक्षकासाठी ब्लॉगींग करण्याच्या फायदयाचा शोध घेणे.
4) शैक्षणिक ब्लॉग हा एक शिक्षणातील नवप्रवाह म्हणून ब्लॉगचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitations) :**

1) सदरील संशोधन हे केवळ महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेल्या ब्लॉगशी संबंधित आहे.

2) महाराष्ट्रातील शिक्षकांनी मराठी भाषेत तयार केलेल्या ब्लॉगचा अभ्यास संशोधकाने केला आहे.
3) महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेल्या ब्लॉगचे विश्लेषण केवळ शैक्षणिक बाजू लक्षात घेऊन करण्यात आले आहे.
4) निरीक्षणात्मक साधनाचा अवलंब करून ब्लॉगचे विश्लेषण केले आहे.
5) संशोधकाने ब्लॉगरच्या वा ब्लॉगच्या तांत्रिक रंगसगती आणि नकारात्मक बाजू लक्षात घेतल्या नाहीत.
6) केवळ शिक्षकांनीच तयार केलेल्या ब्लॉगचा अभ्यास संशोधकाने केला आहे.
7) संशोधनाचा उद्देश ब्लॉगचा केवळ विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा असून तुलनात्मक अभ्यास करणे हा नाही.

## संशोधन पद्धती (Research Methodology) :

1) संशोधन पद्धती : सदरील संशोधनासाठी संशोधकाने दस्तऐवज पृथ्थकरण पद्धतीचा अवलंब केला.
2) नमुनानिवड : महाराष्ट्रातील शिक्षकांनी मराठी भाषेत तयार केलेले एकूण 20 ब्लॉग संशोधनासाठी निवडण्यात आले.
3) संशोधनाचे साधन : ब्लॉग विश्लेषणासाठी संशोधकाने निरीक्षण या साधनाचा वापर केला.

## संकलित माहितीचे विश्लेशण व अर्थनिवर्चन : (Data Interpaction)

### शिक्षकासाठी ब्लॉगींगचे फायदे :(Merits of Blogging for Teachers)

#### 1) चांगला लेखक बनण्यासाठी :

लेखक बनण्याची इच्छा सर्वांचीच असते. एक चांगला शिक्षक उत्तम लेखक असतोच परंतु त्याला आपले लेखन कार्य कोठे प्रसिद्धीस पाठवावे हे लक्षात येत नाही. बरेचदा लेखन कार्य प्रसिद्धीस पाठवून देखील त्यास प्रसिद्धी असे नाही. यावर उत्तम उपाय म्हणजे स्वतःच्या ब्लॉगवर लेखन करणे. यावर तो कथा, कविता ,लेख आणि बरेच काही लेखन करून ऑनलाईन प्रकाशित करू शकतो.

#### 2) वाचकांचा तात्काळ प्रतिसाद :

आपण लिहलेला लेख हा ब्लॉग वर सर्व वाचकांना उपलब्ध होतो. वाचक तो लेख ऑनलाईन वाचन करू शकतात. तसेच आवश्यकता भासल्यास प्रिंट करून जतन करून ठेऊ शकतात. लेखकाने लिहलेला लेख आवडला तर वाचक त्यावर प्रतिक्रिया नोंदवू शकतात. तशी सोय ब्लॉग मधील Comment Box मध्ये असते. त्यात लॉगीन करून प्रतिक्रिया नोंदविता येते.

#### 3) स्वतःला संबंधित क्षेत्राचे तज्ज्ञ म्हणून पुढे येण्यासाठी :

अनेकदा आपण आपल्या विषयात तज्ज्ञ असतो. अनेक लोकांना आपल्या विषयाची माहिती हवी असते. अशावेळी आपल्या तज्ज्ञतेचा फायदा इतरांना बरोबर आपल्याला देखील होतो. आपण आपल्याला एखादया क्षेत्राचे असलेले ज्ञान आपण ब्लॉगच्या मदतीने सर्व जगासमोर मांडू शकतो. त्यातूनच स्वतःला संबंधित क्षेत्राचे तज्ज्ञ म्हणून पुढे येण्यासाठी संधी प्राप्त होते.

#### 4) चांगले मानवी संबंधाचे जाळे प्रस्थापित करण्यासाठी :

आपण ज्या विषयाचे तज्ज्ञ आहोत त्या विषयावर आपण अनेकाशी चर्चा करून मानवी संबंधा वा मानवी संबंधाचे जाळे प्रस्थिपित करू शकतो. आपला मोठा वाचक वर्ग आपल्याशी जोडला जातो. तसेच आपल्या नवीन वा नव्याने प्रकाशित होत असलेल्या लेखाची वाट वाचक वर्ग पाहत असतो.

#### 5) ज्ञानाचा प्रसार करणे :

आधुनिक जगात प्रत्येक व्यक्तीकडे कोणते ना कोणते ज्ञान आहे. जसे एखादयाला चांगले गणितीय ज्ञान आहे. तर दुस—याला इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे. एखादयाला एखादी कला आत्मसात आहे आणि ती कला दुस—याला शिकविण्याची इच्छा त्याला आहे. तर त्याचा प्रसार करण्यासाठी ब्लॉग हे उत्तम साधन आहे. ब्लॉगच्या मदतीने मी माझे ज्ञान दुस—याना सहजतेने देऊ शकतो.

#### 6) स्वतःला अभिव्यक्त करणे :

जर तुम्ही स्वतःला अभिव्यक्त करू शकत असाल तर त्यासाठी ब्लॉग लिहणे हा एक चांगला मार्ग आहे. समजा तुम्ही एक उत्तम शिक्षक आहात आणि सोप्यात सोप्या वा सहजतेने एखादा विषय तुम्ही विद्यार्थ्यांना लेखनाच्या माध्यमातून समजावून सांगू शकाल तर त्याविषयावर एक ब्लॉग बनूवन तुम्ही स्वतःला अभिव्यक्त करू शकता.

#### 7) शैक्षणिक नवप्रवाहाची शिक्षकांना माहिती देण्यासाठी :

शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन संकल्पना, प्रयोग, उपक्रम, योजना आणि कार्यक्रम यांची माहिती इतर शिक्षकांना प्रदान करण्यासाठी ब्लॉग हे चांगले माध्यम आहे. पूर्वी आपण उपक्रमाची माहिती माहितीपुस्तिका छापून त्याद्वारे दिली जात असे. आज मात्र ब्लॉगच्या माध्यमातून हे कार्य करणे सहज शक्य होते. त्यातून छपाईच्या खर्चात देखील मोठी बचत होते.

#### 8) दैनदिंन अध्यापनात ब्लॉगचा वापर :

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील शिक्षकाला तंत्रज्ञानाचा अध्यापनात उपयोग करणे आवश्यक आहे. अनेक शिक्षक तंत्रज्ञानाचा उपयोग करतांना दिसून येत आहेत. अनेक शिक्षकांनी स्वतचे ब्लॉग तयार केले आहेत. उच्च शिक्षणात देखील मोठ्या प्रमाणात आपण दैनदिंन अध्यापनात ब्लॉगचा वापर करू शकतो.

#### 9) विद्यार्थ्यांना केव्हाही आणि कोठेही अध्ययनाचे फायदे मिळवून देण्यासाठी :

एक चांगला शिक्षक वर्गातील अध्यापनाचे सर्वच फायदे ब्लॉगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांस मिळवून देवु शकतो. जसे दैनंदिन अध्यापनात वापरलेल्या नोट्स, टिपने, पीपीटी वा व्हिडीओ इत्यादी साहित्य आपल्या ब्लॉग वर अपलोड करून तो विदयार्थ्यांना उपलब्ध करून देवु शकतो.

**10) विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण अध्ययनास प्रोत्साहन देण्यासाठी :**

वर्गात शिकविलेला अध्ययन घटक विद्यार्थ्यांना एकादाच पूर्ण समजतोच असे नाही. अशा वेळी विद्यार्थ्यांना ब–याचदा पूरक वाचन साहित्य उपलब्ध करून दयावे लागते. अशावेळी शिक्षक निर्मित ब्लॉग हा विद्यार्थ्यांच्या अध्ययनास प्रोत्साहन देणारा ठरतो. शिक्षकाने जर अधिकचे अध्ययन साहित्य वा पुरक साहित्य आपल्या ब्लॉगवर अपलोड करून ठेवले तर विद्यार्थ्यी हवे त्या वेळी त्या साहित्यांचा लाभ घेवू शकतो.

**11) विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होणे आणि चिकीत्सक विचार करण्याची सवय लावण्यासाठी :**

पारंपरिक अध्ययनाच्या प्रक्रियेत विद्यार्थी सहजतेने त्याला पडलेले प्रश्न शिक्षकाला विचारत नाही. प्रश्न विचारण्या संदर्भात त्यांच्या मनात भिती असते वा आपल्याला इतर विदयार्थ्यी काय म्हणतील ? वा काय भाष्य करतील? याची भिती त्यांच्या मनात असल्याने तो प्रश्न विचारत नाही. मात्र ऑनलॉइन ब्लॉगवर सरळ पणे संबंधित घटकांच्या खाली तो प्रश्न विचारण्यास वाव असल्यांने तो प्रश्न विचारू शकतो.

**12) संप्रेषण कौशल्याचा विकासासाठी :**

संप्रेषण हा शिक्षणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. विद्यार्थी व शिक्षकांसाठी संप्रेषण चांगले असणे आवश्यक आहे. शिक्षक वा विद्यार्थी ब्लॉग लेखनाच्या मदतीने आपले संप्रेषण अधिक प्रभावी करू शकतात. विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना ब्लॉग लेखकनातून संप्रेषण विकासाची संधीच प्राप्त होते.

**13) सृजनात्मक विचाराचा विकास करण्यासाठी :**

लेखकाकडे सृजनात्मकता असणे आवश्यक आहे. लेखक प्रामुख्याने आपले लेखन कार्य अधिकाधिक सृजनात्मक व्हावे यासाठी प्रयत्न करतात. ब्लॉग हा सृजनात्मक विचाराचा विकास करण्यासाठीचा एक चांगला मार्ग ठरू शकतो. जर सातत्याने ब्लॉगवर लेखन कार्य केल्यास विद्यार्थी आणि शिक्षकाच्या सृजनात्मक विचाराचा विकास होण्यास मदत होते.

**14) अनौपचारिक रितीने अध्ययन होण्यासाठी :**

औपचारिक अध्ययन विद्यार्थी करतात परंतु सातत्याने अध्यापनात नावीन्यता असेल तर विद्यार्थींना प्रोत्साहन प्राप्त होते. अध्ययनात नवनवीन प्रयोग करणारा शिक्षक हा आपल्याला नेहमीच आवडतो. ब्लॉग लेखन आणि त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यास प्रोत्साहन दिले तर अनौपचारिक पध्दतीने अध्ययन होण्यास ही बाब महत्त्वाची ठरते.

**15) ब्लॉग 24 तास अध्यापन पूरविणारा अध्यापक :**

ब्लॉग व्दारा अध्ययन करण्यास वेळेची मर्यादा राहत नाही विद्यार्थी हवे तेव्हा आणि हव्या त्यावेळी ब्लॉगवाचन करू शकतो तसेच अध्ययन साहित्य प्राप्त करू शकतो.

## महाराष्ट्रातील शिक्षकांचे शैक्षणिक ब्लॉग :

महाराष्ट्रातील शिक्षकांनी काही ब्लॉग तयार केले आहेत. काही निवडक ब्लॉग आणि त्याची उपयुक्तता पुढील प्रमाणे आहे.

1) http://mahazpschoollive.blogspot.in : महाराष्ट्रातील विशाल घोलप या शिक्षकांने तयार केलेला सदरील ब्लॉग आहे. या ब्लॉगवर प्राथमिक शिक्षकासाठी अत्यंत उपयुक्त माहिती आणि अभिलेख उपलब्ध आहेत. तसेच विदयार्थ्यांसाठी कविता आणि प्रश्नपत्रिका उपलब्ध आहेत. मराठी भाषते सर्व साहित्य या ब्लॉगवर उपलब्ध असुन ई साहित्य देखील उपल्बध आहे. तसेच शिक्षकांना उपयुक्त ठरणा-या इतर वेबसाईटसच्या लिंक ब्लॉगवर देण्यात आल्या आहेत. सदरील ब्लॉगवरून त्यांनी त्यांच्या युटयूब चॅनलची लिंक्स देखील दिली आहे.

**2)** http://zpprimaryschoolkayre.blogspot.in: महाराष्ट्राच्या नाशिक जिल्हातील कायरे या शाळेतील शिक्षक सुहास कोळेकर यांनी हा ब्लॉग तयार केला आहे. सदरील ब्लॉगवर उपयुक्त शैक्षणिक व्हिडीओ,पीपीटी,कविता,गाणी,बडबडगीते,राबविलेले शैक्षणिक नवोपक्रम, कथासंग्रंह, महाराष्ट्रातील किल्ले आणि शैक्षणिक साहित्य देण्यात आले आहे. सदरील ब्लॉग हा महाराष्ट्रातील इतर शिक्षकांना आणि शालेय विद्यार्थ्यांना उपयुक्त असाच आहे.

**3)** http://primaryteachermaharashtra.blogspot.in : महाराष्ट्रातील शिक्षकांने तयार केलेला सदरील मराठी भाषेत आहे. यावर शालेय कविता ज्ञानरचनावादी शिक्षण आकारिक आणि संकलित मूल्यमापन प्रश्नपत्रिका, बोधकथा, Englsih flash Cards, गणितीय पाढे देण्यात आले आहेत आणि उपयुक्त संकेतस्थळाच्या लिंक्स देण्यात आल्या आहेत. ब्लॉग हा शिक्षक व विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. सरदील ब्लॉग हा घनश्याम सोनवणे या प्राथमिक शिक्षकांने तयार केला आहे.

**4)** http://mahazpteacher.blogspot.in : महाराष्ट्रातील संतोष भोंबळे यांनी हा ब्लॉग तयार केला आहे. ‘महाराष्ट्रीय प्राथमिक शिक्षक’ हे ब्लॉगचे शिर्षक आहे. सदरील ब्लॉगवर परीपाठ आणि शिक्षकासाठी डाउनलोड करण्यास्तव साहित्य देण्यात आले आहे. शिक्षकासाठी उपयुक्त अध्यादेशाकरिता लिंक्स देण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक साहित्य असलेल्या इतर ब्लॉगची लिंक्स देण्यात आली आहे. शिवाय शिष्यवृत्ती आणि सरल यांची माहिती देण्यात आली आहे.

**5)** http://shikshanmitra.blogspot.in: महाराष्ट्रातील शिक्षक प्रशांत क-हाडे यांनी हा ब्लॉग तयार केला असून ‘शिक्षणमित्र’ असे संमर्पक शिर्षक ब्लॉगला देण्यात आले आहे. संगणक, इंटरनेट शिक्षण, कला, कार्यानुभव, टेक मराठी व्हिडीओची लिंक्स,

आणि शिक्षक आणि शाळांना नेहमी उपयुक्त ठरणारी प्रपत्रे आणि बरेच काही सदरील ब्लॉग वर देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील मान्यवरांनी सदरील ब्लॉग हा स्तुत्य उपक्रम असल्याचे नमुद केले आहे.

**6)** http://amravatishikshak.blogspot.in: महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील शिक्षक हमिद पठाण यांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. ब्लॉग वरील ई अध्ययन साहित्य शिक्षक आणि विद्यार्थ्यांना उपयुक्त आहेत. तसेच शिक्षकांसाठी उपयुक्त ठरणा-या इतर लिंक्स देण्यात आल्या आहेत. ब्लॉग वाचकांनी Excellent Work sir… असे शेरे प्रदान केले आहेत.

**7)** http://havelieducation.blogspot.in: महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील शिक्षक प्रदिप भोसले यांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. 'पंचायत समिती हवेली जि. पुणे एक शैक्षणिक चळवळ' असे शिर्षक सदरील ब्लॉगचे आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, ज्ञानरचनावाद, शैक्षणिक साहित्य, लहानमुलासाठी गोष्टी आणि बडबडगीते , इंग्रजी आणि मराठी कविता इत्यादी बाबी ब्लॉगवर आहेत. सदरील ब्लॉगचा उपयोग शिक्षक केंद्रप्रमुख यांच्याकडून माहिती गोळा करण्यासाठी देखील करण्यात येते असुन हा एक चांगला उपक्रम आहे.

**8)** http://zpprimaryteacher.blogspot.in: महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील शिक्षक नरेंद्र गिरी सर यांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. ब्लॉगवर त्यांनी तयार केले काही व्हिडीओ, परिपाठ, काही नवोउपक्रम, शिष्यवृत्ती, शालार्थ प्रणाली, सरल , मध्याह भोजन योजना, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र ,वार्षिक नियोजन आणि इतर उपयुक्त पेजेस आहेत.

**9)** http://misulabhak.blogspot.in: महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील शिक्षक गजानन बोढे यांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. सुलभकाच्या भूमिकेतून लेकरांचे शिकणे सुलभ करणा—या महाराष्ट्रातील तमाम शिक्षकबांधवांकडून वर्गावर्गातून तसेच परिसरातून दिले जाणारे आनंददायी, कृतीयुक्त अध्ययन अनुभव या ब्लॉगच्या माध्यमातून वेळोवळी प्रसारित करणे हा सदरील ब्लॉग निर्मितीचा हेतू सुरवातीच नमुद केला आहे. शिक्षकांने स्वतः उपक्रम राबविले आहेत व त्यांची माहिती ब्लॉगवर देण्यात आली आहे. हे उपक्रमशिल शिक्षक असून त्यांनी शालेय उपक्रमाकरिता स्वतंत्र फेसबुक पेज तयार केले आहे. प्राथमिक शिक्षकासाठी उपयुक्त मानसशास्त्र ब्लॉगवर दिले आहे. उपयुक्त पुस्तके डाउनलोड करण्यासाठी लिंक्स देण्यात आली आहे.

**10)** http://salunkeguruji.blogspot.in: महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील शिक्षक श्री. सांळुके यांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. सदरील ब्लॉग शिक्षक पालक आणि विद्यार्थी यांना उपयुक्त असाच आहे. शिक्षकांना दैनदिंन कार्यासाठी लागणारे दस्तऐवज आणि विविध योजना या माहिती बरोबरच विविध पुस्तके आणि बरीच माहिती सदरील ब्लॉगवर आहे.

**11)** http://www.ravibhapkar.in: महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षक रविंद्र भापकर यांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. ब्लॉगला महाराष्ट्र शिक्षक मंच असे शीर्षक असून त्यावर विद्यार्थी व शिक्षकांसाठी उपयुक्त अध्ययन साहित्य आहे. विविध ॲप,ऑनलाईन टेस्ट आणि तंत्रज्ञान वापराच्या टिप्स देण्यात आल्या आहेत. शालेय पोषण आहार, मूल्यमापन याविषयीच्या पोस्ट ब्लॉगवर आहेत. उपयुक्त ठरणा—या इतर लिंक्स देखील देण्यात आल्या आहेत. ई प्रश्न पेढी आणि विदयार्थी अभ्यासासाठी महत्त्वाच्या बाबी देण्यात आल्या आहेत. शिक्षकासाठी असणा—या ऑनलाईन सेवा करिता लिंक्स देण्यात आल्या आहेत.

**12)** https://sindhuguru.blogspot.in: महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिक्षकांने सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. ब्लॉगला 'सिंधुदुर्ग' असे शीर्षक असून त्याखाली सदैव सर्वासाठी शिक्षक पालक विद्यार्थ्यांसाठी असे वाक्य आहे. ब्लॉगवर सरल माहिती, सेवा नियमावली संचमान्यता, शब्दकोश परिपाठ, महाराष्ट्र कन्या, शालेय नोंदी, व्याकरण, शालार्थ, पाढे, प्रश्नसंच, बोधकथा, आकारिक नोंद, शिष्यवृत्ती, ज्ञानरचनावाद इत्यादी शीर्षकांचे पेज आहेत. संगणकांची माहिती तसेच एनसीआरटीची पुस्तके डाउनलोड करण्याची लिंक देण्यात आली आहे.

13) http://srujanshilshikshak.blogspot.in: महाराष्ट्रातील राजकिरण चव्हाण यांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. 'सृजनशील शिक्षक' हे शीर्षक सदरील ब्लॉगला देण्यात आले आहे. 'New creation with self inspiration' असे वर्णन ब्लॉगवर देण्यात आले आहे. शालेय कामकाजासाठी उपयुक्त असे साहित्य ब्लॉगवर आहे. शिक्षण हक्क कायदयानुसार मुख्याख्यापकाची कामे देण्यात आली आहेत. फलक लेखनाचे सुंदर नमुने देण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील इतर शिक्षकांना उपयुक्त माहिती देण्यात आली आहे. टाकावू पासून टिकावू हा उपक्रम अतिशय चांगला आहे. ब्लॉग हा मुख्याध्यापक व शिक्षक आणि वाचक मित्रांना उपयुक्त आहे.

14) http://shikshansanvad.blogspot.in: महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील समाधान शिकतोड या शिक्षकांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. त्यांनी शाळेत राबविलेले उपक्रम ब्लॉग वर दिले आहेत. ब्लॉगवरील माहिती इतर शिक्षक आणि वाचकांना उपयुक्त आहे.

15) http://techgurumarathi.blogspot.in: महाराष्ट्रातील सुनील सगरे या शिक्षकांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. ब्लॉगवर शिक्षकांना उपयुक्त असे दस्तऐवज उपलब्ध करून दिले आहेत. शिक्षक , विदयार्थी आणि पालक यांच्याकरिता उपयुक्त ॲपची माहिती व त्यांच्या लिंक्स दिल्या आहेत. अतिशय उपयुक्त ॲप एकत्रित पणे देण्यात आल्या आहेत.

16) http://dnyanvahak.blogspot.in: महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील ज्ञानदेव नवसरे या शिक्षकांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. 'ज्ञानवाहक' असे शीर्षक ब्लॉगला देण्यात आले आहे. ब्लॉग मध्ये ज्ञानरचनावादी उपक्रम, तंत्रस्नेही उपक्रम आणि शैक्षणिक उपक्रमाची माहिती देण्यात आली आहे. विविध विषयावरील व्हिडीओ ब्लॉगवर उपलब्ध आहेत.

17) http://ranjitsinhdisale.blogspot.in: महाराष्ट्रातील रजितसिंह डिसले या शिक्षकांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. सदरील ब्लॉगवर त्यांनी शिक्षण आणि इतर विषयावर आपले लेख लिहले आहेत. अतिशय वाचनिय लेखन त्यांनी केले आहे.
18) http://www.ramsalgude.in : महाराष्ट्रातील राम सालगुडे या शिक्षकांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. ब्लॉगवर शिक्षकासाठी उपयुक्त दस्तऐवजासोबतच शाळेत राबविलेले विविध उपक्रम आणि त्याचे व्हिडीओ देण्यात आले आहेत.
19) http://www.santoshdahiwal.in: महाराष्ट्रातील संतोष दहिवळ या शिक्षकांने सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. त्यावर त्यांनी इयत्ता 1 ते 4 करिता विविध ॲप दिल्या आहेत. त्यांच्या ऑनलाईन सराव प्रश्नसंच्याची दखल 'दैनिक सकाळ' मार्फत घेण्यात आली आहे. त्यांनी ब्लॉगवर जुनी पाठयपुस्तके, श्राव्य पुस्तके व इतर पुस्तके दिलेली आहेत.
20) http://marathischool.in: महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील सुरेश भारती, लक्ष्मण नरसाळे आणि गोरक्ष पावडे या शिक्षकांनी सदरील ब्लॉगची निर्मिती केली आहे. सर्व महाराष्ट्रातील शिक्षकांना डिजिटल साहित्य एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी मराठीशाळा ची निर्मिती केली आहे. सर्वच उपयुक्त ई-साहित्य यावर उपलब्ध आहे.

**ब्लॉगचे शैक्षणिक उपयोग :** (Educational Use of Blog's)

महाराष्ट्रातील शिक्षकांनी बनविलेले हा शिक्षणातील नवप्रवाह आहे. वरील ब्लॉगचे शैक्षणिक उपयोग पुढील प्रमाणे आहेत.

1) सदरील ब्लॉग हे विदयार्थी, पालक, शिक्षक , मुख्याध्यापक यांना अतिशय उपयुक्त आहेत.
2) ई साहित्य वा डिजिटल साहित्य प्राप्तीसाठी शिक्षक ब्लॉग हे उपयुक्त आहेत.
3) इयत्ता नुसार विविध शैक्षणिक ॲप्स (apps) ब्लॉगवर उपलब्ध आहेत.
4) शिक्षकांना दैनंदिन कार्यापूर्तीसाठी लागणारे सर्व दस्तऐवज व प्रपत्रे एकाच व्यासपीठावर उपलब्ध करणे ब्लॉगींग मूळे शक्य झाले आहे. त्यातून शिक्षकांचा वेळ वाचण्यास मदत होते.
5) शासकिय योजना वा कार्यक्रमासाठी नियमित पणे दयावयाची माहिती कशी भरावी वा त्यासाठी कोणत्या वेबसाईट आहेत. यासाठी शिक्षक निर्मित वरील ब्लॉग सुलभकाची भूमिका बजावतात.
6) ब्लॉगवरील अध्ययन साहित्य जसे कविता, कथा, बडबडगीते, व्हीडीओ आणि ऑडिओ स्वरूपात उपलब्ध झाल्याने शिक्षण प्रक्रिया आनंददायी बनविण्याकरिता ब्लॉग महत्त्वाची भूमिका बजावतात.
7) विविध योजना जसे प्रगत शैक्षणिक कार्यक्रम,सरल , मध्याह भोजन योजना आणि शिक्षकांचे नवोपक्रम इत्यादी विषयी वाचकांना व शिक्षणतज्ज्ञांना हे ब्लॉग उपयुक्त ठरतात.
8) महाराष्ट्रातील इतर सर्वच शिक्षकांना तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर करण्यास सदरील ब्लॉग प्रोत्साहन देतात.
9) ब्लॉग हे 'डिजिटल शाळा' निर्मितीस उपयुक्त आहेत.

**समारोप:**

महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेले वरील ब्लॉग आधुनिक शिक्षणातील एक नवप्रवाह आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात जिल्हापरिषदेच्या प्राथमिक स्तरावर कार्यरत हे ब्लॉगर शिक्षक आधुनिक तंत्रस्नेही आहेत. ब्लॉगर शिक्षक ज्ञानप्रसारकाची भूमिका निभावंत आहेत. आधुनिक युगांत माहितीचा वेगाने प्रसार होण्यासाठी तंत्रज्ञाना शिवाय दुसरा उत्तम पर्याय नाही हे शिक्षक ब्लॉगरनी जाणले आहे. शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर करून घेण्याबरोबरच आपल्या महाराष्ट्रील इतर शिक्षक बांधवाना देखील यासाठी प्रेरित केले आहे. मोठया प्रमाणात अभ्यासघटकातील ई-साहित्यांची निर्मिती करून ते सर्वांना उपलब्ध व्हावे यासाठी ब्लॉगवर प्रकाशित केले आहे. यातून शिक्षकांचा व्यापक दृष्टिकोन दिसून येतो. विद्यार्थी आणि पालकांच्या शिक्षणाकडे बघण्याच्या दृष्टिकोन व्यापक करण्यात हे ब्लॉग महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. सर्व ब्लॉग हे मराठी भाषेतून आहेत त्यातून मराठी भाषेला जागतिक स्थान या शिक्षकांनी मिळवून देण्यास हातभार लावला आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. शिक्षणक्षेत्रातील विविध नवनवीन कार्यक्रमांची सर्वंकष माहिती मिळवून देण्यास वरील ब्लॉग आपणास मदत करतात. म्हणूनच महाराष्ट्रातील शिक्षकांनी तयार केलेले हे ब्लॉग आधुनिक शिक्षणातील एक नवप्रवाह (New Trends In Education) ठरत आहेत. शिक्षकांचे हे ब्लॉग डिजीटल इंडियाचा (Digital India) आरसा ठरत आहेत.

**संदर्भसूची (References) :**

https://en.wikipedia.org/wiki/History_of_blogging
https://startbloggingonline.com/blog-platform-comparison-chart/
https://en.wikipedia.org/wiki/Blog
https://www.incomediary.com/biggest-blogging-benefits
http://mahazpschoollive.blogspot.in
http://zpprimaryschoolkayre.blogspot.in
http://primaryteachermaharashtra.blogspot.in

http://mahazpteacher.blogspot.in
http://shikshanmitra.blogspot.in
http://amravatishikshak.blogspot.in
http://havelieducation.blogspot.in
http://zpprimaryteacher.blogspot.in
http://misulabhak.blogspot.in
http://www.ravibhapkar.in
https://sindhuguru.blogspot.in
http://srujanshilshikshak.blogspot.in
http://shikshansanvad.blogspot.in
http://techgurumarathi.blogspot.in
http://dnyanvahak.blogspot.in
http://ranjitsinhdisale.blogspot.in
http://www.ramsalgude.in
http://www.santoshdahiwal.in



**डॉ.संतोष खिराडे**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.